# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका

संपादक

**प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे**



# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका (संपादित)

# Role and Contribution of Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj in Nation Building (Ed.)

**संपादक :**

प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे

**सह संपादक :**

प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. अभिजीत यादव, डॉ. संभाजी पाटील,
डॉ. राजशेखर सोलापुरे, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा. सुदर्शन पाटील,
प्रा. माधव शेळके, प्रा. श्रीकृष्णा पांचाळ, डॉ. वितेश निकते,
प्रा. दिपीका स्वामी

ISBN 978-93-91689-21-6

अरुणा प्रकाशन

१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४ ८६९३५, ९४२१३ ७१७५७

© सर्व हक्क - प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

प्रथम आवृत्ती : १२ ऑक्टोबर २०२२

मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्युटर, लातूर

मूल्य : ५००.०० रुपये

*'छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका' या ग्रंथातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी महाविद्यालय प्रशासन, संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

१२. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य
डॉ.रमेश जगन्नाथ निकम .................................. ८८
१३. राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक सुधारणे संबंधीचे विचार
प्रा. डॉ. हरिशचंद्र जनार्दन चौधरी .................................. ९२
१४. शैक्षणिक सुधारणांमधील छत्रपती राजर्षी शाहू
महाराजांची भूमिका : एक चिंतन
प्रा. डॉ. महेश मोटे .................................. ९९
१५. सामाजिक न्यायाचे जनक: लोकराजा
छत्रपती राजर्षी शाहू महाराज
डॉ. संभाजी पाटील, प्रा. बापूसाहेब जवळेकर .................................. ११४
१६. शाहू महाराज आणि सामाजिक न्याय
डॉ. डी. एस. पटवारी .................................. १२२
१७. छत्रपती राजर्षि शाहूमहाराज यांचे आरक्षण
आणि सामाजिक न्यायाचे धोरण
डॉ दत्ताजी हुलप्पा मेहत्रे .................................. १२७
१८. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण
प्रा. सुदर्शन पाटील .................................. १३१
१९. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक दृष्टिक्षेपाची चिकित्सा
प्रा. डॉ. यशवंत वळवी .................................. १३५
२०. राजर्षी शाहू महाराजांचे कल्याणकारी प्रशासन
डॉ. दिपक सुभाष वाघमारे .................................. १३९
२१. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची कृषीनीति
डॉ. अनिल माधव रेड्डी .................................. १४८
२२. शैक्षणिक सुधारणांमधील छत्रपती राजर्षी
शाहू महाराजांची भूमिका
डॉ. भीमराव पाटील .................................. १५२
२३. छत्रपती राजर्षी शाहू महाराज व शैक्षणिक धोरण
डॉ.वितेश भारत निकते .................................. १५८
२४. छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि आरक्षण धोरण
प्रा. किर्ती विजय करंजावणे .................................. १६३

# ॥ १८ ॥

# राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण

□□□

**प्रा. सुदर्शन पाटील**

आधुनिक काळात लोकशाही शासनाचे यशापयश मोजण्याचे साधन म्हणजे त्याच्या सार्वजनिक धोरणाचे मूल्यमापन करणे होय. नागरिककेंद्रित सार्वजनिक धोरणे नागरिकांचे जीवन सुसह्य व प्रगतिशील बनवतात. मग ते कृषीधोरण असो, आरोग्यविषयक धोरण असो की शैक्षणिक असो अशी धोरणे आखणाऱ्यांकडे नागरिकांचे प्रश्न समजणारी दूरदृष्टी व ते प्रश्न सोडविण्याची तळमळ असावी लागते. भारतात स्वातंष्य प्राप्तीनंतर शैक्षणिक धोरण आखले गेले. त्यात वेळोवेळी सुधारणाही केल्या गेल्या. आज शिक्षणाचे नवीन धोरण येऊ घातले आहे ते कसे आहे, कीती सुसंगत आहे, त्याचे कोणते परिणाम शिक्षणक्षेषात घडून येतील हे येणारा काळच ठरवेल. माष भारतात शिक्षणाची सुरुवात जेव्हा झाली, तेव्हा त्यासमोर अनेक आव्हाने होती गरिबी निरक्षरता, अंधश्रद्धा अशा अनेक समस्यांनी ग्रस्त असलेल्या भारतीय समाजाला शिक्षणाकडे वळवणे त्याला शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे हे खूप कठिण कार्य होते. आज शिक्षण सर्वांना हवे आहे, पण ते गुणवत्तापूर्ण मिळत नाही. याउलट स्वातंष्यपूर्व काळात शिक्षण गुणवत्तापूर्ण होते पण ते सर्वांना मिळत नव्हते आणि कोणाला हवेही नव्हते. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांनी अंगीकारलेला सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वषिकीकरणाचा वसा छषपती राजर्षी शाहू महाराजांनी स्वीकारला. शिक्षण प्रसाराच्या ध्यासाने प्रेरित होऊन त्यावेळच्या समाजाची शैक्षणिक गरज ओळखून शाहू महाराजांनी आपले शैक्षणिक धोरण आखले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लोकांच्या वैचारिक मागासलेपणाचा सामना करीत त्यांनी आपले शैक्षणिक धोरण आखले व राबवले.

आज लोकशाही हा शासनप्रकार सर्व देशांमध्ये लोकप्रिय असल्याचे पाहावयास मिळते. स्वातंष्य, समता, न्याय, बंधुता, धर्मनिरपेक्षता, शाश्वत विकास इत्यादी मुल्यांवर आधारित हा शासनप्रकार आहे. आज मानवी जीवनास

याच मुल्यांची नितांत आवश्यकता आहे. राजर्षी शाहू महाराज एकदृष्टे राज्यकर्ते होते. आजच्या या आधुनिक लोकशाही मुल्यांचा विचार त्यांनी आपल्या संस्थानातील शैक्षणिक धोरण ठरविताना स्वातंत्र्यपूर्व काळात केला. यातून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. शाहू महाराजांनी जी शिक्षणव्यवस्था आपल्या संस्थानात उभारली त्याकाळात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणासाठी त्यांनी क्रांतिकारी निर्णय घेतले, त्यामध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या लोकशाही मुल्यांचा त्यांनी आपल्या शिक्षणविषयक धोरणात स्थान दिले. त्यामुळे शिक्षण तळागळातील श्शोषित, वंचित, दलित घटकांपर्यंत पोहोचवण्याचा मार्ग सुकर झाला.

**१. राजर्षी शाहूंची शैक्षणिक भूमिका –**

शिक्षणाची गंगा समाजाच्या तळागळापर्यंत जाऊन पोहोचली पाहिजे. समाजातील अगदी शेवटचा माणूस सज्ञान झाला पाहिजे. आपला समाज सर्वार्थानी उन्नत व्हावा ही शाहू महाराजांची महत्त्वाकांक्षा होती. कालबाह्य झालेला समाज हा नवसमाजाची निर्मिती होऊ देत नव्हता. त्यावर शिक्षण हाच एकमेव उपाय आहे. असे शाहू महाराजांचे ठाम मत होते.

**२. शिक्षण हे साधन आहे –**

शाहू महाराज प्रामख्याने बुद्धीप्रामाण्यवादी होते. शिक्षण हे समाजसुधारणा, आणि सामाजिक जागृतीचे प्रमुख साधन आहे, असे त्यांचे मत होते. नाशिक येथील उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीच्या पायाभरणी समारंभावेळी शाहू महाराज शिक्षणाची गरज स्पष्ट करताना असे म्हणाले होते की, ''खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी जू लादले आहे ते झुगारुन देण्याची शक्ती समाजाच्या अंगी येण्यासाठी सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे.'' छत्रपती शाहू महाराजांनी बहुजनांच्या शिक्षण वंचिततेचे हे दुष्टचक्र भेदावयाचे ठरवून आपल्या प्रजेसाठी शैक्षणिक धोरण राबविले. आपल्या राज्यातील प्रजेला शिक्षणाचा लाभ व्हावा म्हणून विविध प्रकारच्या योजना आखून त्या स्वतः राबविल्या ३० सप्टेंबर १९१७ रोजी कोल्हापूर संस्थानात सक्तीचा व मोफत शिक्षणाचा जाहीरनामा त्यांनी प्रसिद्ध केला. शाहू महाराजांनी शाळेत गैरहजर राहणाऱ्या मुलांच्या पालकांना दंड आकारणारा हुकुम काढला होता. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सवर्ण आणि अस्पृश्यांच्या वेगवेगळ्या शाळा भरविण्याची समाजविघातक पद्धत बंद केली. त्यांना उच्च शिक्षणापेक्षा बहुजनांच्या सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षण अधिक महत्त्वाचे वाटत होते. म्हणून त्यांनी त्यावर अधिक भर दिला.

**३. स्त्रीशिक्षण –**

राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाकडेही विशेष लक्ष दिले होते. आपल्या राज्यात दौरे केल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की डोंगराळ भागात मुलींच्या शाळेची नितांत आवश्यकता आहे. म्हणून भूदरगड, गडहिंग्लज भागात मुलींची शाळा काढण्याचा आदेश त्यांनी दिला. कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणासाठी एका खास अधिकारी पद निर्माण करण्यात आले. सौ. रखमाबाई केळकर या भारतीय शिक्षित महिलेची या पदावर त्यांनी नेमणूक केली होती. अनेक स्त्रियांना त्यांनी शिक्षणासाठी आर्थिक मदत केली. कृष्णाबाई या महिलेला मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये शिक्षण घेण्यासाठी शाहूंनी आर्थिक मदत केली. त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर कोल्हापूरातील सरकारी दवाखान्यात त्यांची डॉक्टर म्हणून नेमणूक केली. मुलांच्या शाळेत शिकणाऱ्या मुली आणि त्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांचा शाहूंना अभिमान वाटत असे. संस्थानाबाहेर असणाऱ्या महर्षि कर्वे यांच्या हिंगणे येथील महिला आश्रमास त्यांनी ५०० रुपयांची मदत दिली होती. याशिवाय मागासलेल्या समाजातील स्त्रियांनाही शिक्षण मिळावे यासाठी शाहू महाराज धडपड करीत होते. त्यासाठी त्यांनी अशा स्त्रियांच्या राहण्याजेवणाची व्यवस्था केली होती. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे असे शाहू महाराजांना वाटत होते. म्हणून स्त्री शिक्षणासाठी ते टप्प्याटप्प्याने वाटचाल करीत होते.

**४. कोल्हापूर वसतिगृहांचे माहेरघर –**

दारिद्र्यामध्ये खितपत पडलेल्या बहूजन समाजाला शिक्षण घेणे सुलभ व्हावे म्हणून शाहू महाराजांनी गरिब मुलांसाठी कोल्हापूरात अनेक वसतिगृह सुरु केले होते. महाराणी व्हिक्टोरिया मराठा बोर्डीग इन्स्टिट्युशन दिगंबर जैन बोर्डीग, मुस्लीम बोर्डीग, लिंगायत बोर्डीग, मि. क्लार्क हॉस्टेल, नामदेव बोर्डीग, कायस्थ प्रभू बोर्डीग, सारस्वत बोर्डीग, पांचाळ ब्राम्हण बोर्डीग, इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल, दैवज्ञ बोर्डीग, आर्यसमाज बोर्डीग इ. जातवार वसतिगृहे सुरु करुन अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची, राहण्याची व जेवणाची सोय महाराजांनी आपल्या संस्थानात केली होती. याशिवाय आपल्या संस्थानात केली होती. याशिवाय आपल्या संस्थानाबाहेरही त्यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी वसतिगृहे स्थापन करण्यास आर्थिक मदत केली होती. याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागांतून येणाऱ्या गरिब व होतकरु मुलांना शिक्षणाची आवड निर्माण व्हायला मदत झाली. कोणत्याही परिस्थितीत सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहू नये. यासाठी महाराजांनी ही वसतिगृहे स्थापन केली. या सर्व वतिगृहांतून अनेक

नामवंत विद्यार्थी तयार झाले. बहुजन वर्गातील उच्चशिक्षितांची पहिली पिढी या वसतिगृहांतून तयार झाली. आपल्या संस्थानातील अस्पृश्यांचा आणि मागास वर्गाचा उद्धार शिक्षणातून करण्याचे शाहू महाराजांचे स्वप्न या वसतिगृहांमुळे पूर्ण झाले.

## ५. शिक्षणातून समाजपरिवर्तन -

जातिभेद, अंधश्रद्धा निरक्षरता इत्यादीमुळे मागास राहिलेल्या संस्थानातील प्रजेला शिक्षणातून आधुनिक बनवण्याची गरज शाहू महाराजांनी ओळखलेली होती. राजर्षी शाहूंच्या परिवर्तनवादी विचारांच्या संकल्पनेत सर्वांना स्वातंत्र्य, समान अधिकार व न्याय मिळवून देण्याचा विचार होता. या विचारातूनच त्यांनी अस्पृश्य, मागास, वंचित व स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य करण्याचा संकल्प मनाशी बाळगून व शिक्षण हे साधन हाती घेऊन परिवर्तनाचे कार्य गतीने सुरु केले. कोल्हापूर संस्थानाचा कारभर हाती येताच त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले व प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. या प्राथमिक शिक्षणावर ते संस्थानाच्या उत्पन्नातून दरवर्षी एक लाख खर्च करत होते. पुढे हा खर्च तीन लाखांवर गेला. यातून समाज परिवर्तनासाठी शाहूंनी भरीव आर्थिक तरतूद केली होती हे दिसून येते.

अशा प्रकारे लोकशाही मुल्यांवर आधारित शिक्षणव्यवस्थेची सुरवात राजर्षी शाहूंनी आपल्या शैक्षणिक धोरणाद्वारे केली होती. शाहूंचे शैक्षणिक धोरण हे सर्वसमावेशक, सार्वत्रिक व कल्याणकारी होते असे दिसून येते.

संदर्भ


१) कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११
२) डॉ. कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१८
३) जाधव रमेश, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, २०१६
४) पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७
५) डॉ. जगदाळे मनीषा, शाहू महाराजांची शैक्षणिक कामगिरी, विद्यावार्ता, २०१७



**प्रा. सुदर्शन पाटील**
राज्यशास्त्र विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर


OOO